# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट दिनांक २३/०७/२०२०

## .......मा.चंद्रकात दादा पाटील प्रदेशाध्यक्ष भाजप महाराष्ट्र राज्य यांचा पी.ए बोलतोय म्हणून २५ लाखाची मागणी करणा-या आरोपीस २४ तासात निगडी पोलीसांनी केली अटक

दि.१८/०७/२०२० रोजी १६.००वा चे सुमा. लोकमान्य हॉस्पीटल निगडी येथील डॉक्टर श्रीकृष्ण गंगाधर जोशी वय.४४ धंदा-डॉक्टर रा.वृंधावन सोसायटी ए-६ से.नं.२९ ईस्कॉन मंदीर समोर रावेत पुणे हे त्यांचे हॉस्पीटल मध्ये हजर असताना त्यांचे मोबाईल फोनवर अज्ञात इसमाने फोन करून 'मी चंद्रकात दादा पाटील यांचे ऑफीस मधून दादाचा पी.ए सांवत बोलतोय कोरोनाच्या महामारीमुळे गरीबांची अवस्था बिकट झाली आहे त्यांचे मदतीसाठी ताबडतोब २५ लाख रूपयाची रक्कम आमच्या पर्वतीच्या कार्यकर्त्याकडे पाठवून द्या नाहीतर तुमचे हातपाय तोडून जिवे मारून टाकीन अशी धमकी दिल्याने डॉक्टर श्रीकृष्ण गंगाधर जोशी यांनी त्या बाबत मा.चंद्रकात दादा पाटील यांचे कडे शहानिशा केली असता तसा काहीएक प्रकार नसल्याचे माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी निगडी पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमा विरूध्द तक्रार दिल्याने निगडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२६५/२०२० भा.द.वि.स.कलम ३८७,५०१,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

दाखल गुन्हयाचे अनुषंगाने मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड,श्री.संदीप बिष्णोई यांनी योग्य त्या सुचना देवुन विशेष मार्गदर्शन केले त्याप्रमाणे मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गणेश जवादवाड यांनी तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांची दोन पथके तयार करून त्यांना योग्य त्या सुचना देवून मार्गदर्शन केले, त्याप्रमाणे तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांनी सदर गुन्हयाचा अभ्यास करून तांत्रीक मदत घेवुन गुन्हयातील आरोपी विरूध्द पुणे शहरामध्ये सापळा लावला असता, सदर सापळयात एक इसम मिळुन आला त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे बारकाईने तपास केला असता त्याने दाखल गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास नाव पत्ता विचारता त्याने सौरंभ संतोष अष्टुल वय २१ वर्षे रा.लोहीयानगर गल्ली नं.१ गंजपेठ पुणे ४२ असे सांगितल्याने त्यास दाखल गुन्हयात अटक करून त्यांचेकडून गुन्हयात वापरलेले मोबाईल व सिमकार्ड तसेच एक मोटार सायकल असा एकूण किं.रु.३५,०००/- चा माल हस्तगत करणेत आला असुन, त्यास आज रोजी मा.न्यायालयात हजर देवले असता मा.न्यायालयाने त्याची ३ दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे. गुन्हयामध्ये इतरही आरोपी आहेत का या बाबत अधिक तपास निगडी पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड,श्री.संदीप बिष्णोई, मा.अप्पर पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उपआयुक्त सो.परि-१, पिंपरी चिंचवड, श्रीमती स्मिता पाटील, मा.सहायक पोलीस आयुक्त सो, पिंपरी विभाग श्री. रामचंद्र जाधव, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गणेश जवादवाड, सपोनि लक्ष्मण सोनावणे, पोउपनि ज्ञानेश्वर कोकाटे,पोउपनि महेंद्र आहेर, पोहवा किशोर पढेर, पोहवा मच्छिद्र घनवट, पोना सतिश ढोले, विलास केकाण, रमेश मावसकर, पोशि सोपान बोधवड, आत्मलिंग निंबाळकर, सुनिल जाधव, भुपेंद्र चौधरी, विनोद व्होनमाने, विजय बोडके, तुषार गेंगजे, राहुल मिसाळ, तानाजी सोनवणे यांनी केली आहे.